म. ग्रं. सं. ठाणे

विषय ...ांबरीस

लेखक रामचंद्र निळकंठ सहस्रबुद्धे

ग्रंथालय क्रमांक ५१५६

पुस्तकाचें नांव डाकेसा...ा फुरवणी

मन

१५६१२

म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहा
सं. नं. ५२९
१८८८

...बुद्धे वांईकर

# इतिहासाची पुरवणी

अथवा

वांईत झालेल्या अन्यायाचें

व जुलमाचें प्रदर्शन.

किंमत ४ आणे.

## आर्यधर्मदर्पण.

श्री महाभारत, योगवासिष्ठ, व पराशरस्मृति यांचें मुळासुद्धां भाषांतर या पुस्तकांत येतें. भारताचीं पहिलीं दोन पर्वें व योगवासिष्ठाचीं पहिलीं दोन प्रकरणें संपून पुढलीं सूरू आहेत. पाक्षिक पुस्तकाची वर्गणी ८।१२ व मासिकाची ४।६

## आर्यधर्मरहस्य.

श्री भगवद्गीतेवर श्री जगद्गुरू शंकराचार्य यां अप्रतिम भाष्य मूळ व भाषांतर सहीत येत असून गीत ही देण्यांत येते. किंमत २।६

## मोदवृत्त.

धार्मिक, राजकीय, सामाजिक वगैरे विषयांवर ... र्मिक लेख येत असून सुश्रुत व वाल्मिकी रामायण यां मुळासुद्धां भाषांतर येतें. पत्राशिवाय १०० पृष्ठांचे भाषांतर संग्रहीं राहतें. आर्यधर्मदर्पणच्या पाक्षिक वर्गणीदारांस हें भाषांतर फुकट मिळेल. किंमत १।१३.

काशिनाथ वामन ले

श्रीक्षेत्रवाई जि० सात

## विक्रिस तयार.

१ व्यापाऱ्यांचा मदतनीस किं. ०६ ट. ह. ०॥

२ महाराष्ट्रवीर अथवा श्री. पहिले बाजीराव यांचें नाटक. ०१० ०१

३ बालनीति भाग१ ०३ ०॥

४ बालनीति भाग२ ०४ ०॥

५ राष्ट्रीयसभेचें अल्पदिग्दर्शन ०१ ०॥

सर्व पुस्तकें घेणारास ट.ह. व्ही. पी.पॅकिंग माफ.

रामचंद्र निळकंठ सहस्र

कसबा पेठ श्री. दिक्षितांचा वा

स.इ.३८२

# इतिहासाची पुरवणी

अथवा

## वांईत द्वारासंबंधीं झालेल्या खटल्यांतील
## जुलमाचें व अन्यायाचें प्रदर्शन.

हें पुस्तक

**रामचंद्र निळकंठ सहस्रबुद्धे वांईकर**

महाराष्ट्रवीर, व्यापाऱ्यांचा मदतनीस,
राष्ट्रीय सभेचें अल्पदिग्दर्शन इ.
पुस्तकांचे कर्ते

यांनीं लिहिलें तें

कृष्णाजी बाबाजी सुभेदार यांनीं
पुणें येथें “ श्री सिद्धिविनायक ” छा. छापिलें.

सन १८९६.

[ सर्व हक्क कर्त्यानें राखिले आहेत. ]

किंमत ४ आणे

वांईतील ज्या सभ्य, प्रतिष्ठित व
अनुदार अशा १४ सद्गृह-
स्थांना अन्यायानें
**तुरुंगवास**
भोगावा लागला,
त्यांना त्यांच्या दुःख परि-
मार्जनार्थ हें पुस्तक अर्पण केलें
असे.

नम्र सेवक

रामचंद्र निळकंठ सहस्त्रबुद्धे वांईकर.

# प्रस्तावना.

वांईतील सभ्य गृहस्थास दुःसह असा दुर्गवास भोगावा लागून त्यांचे त्यावेळीं जे हाल झाले, त्यासंबंधीं तोटक माहिती हिंदुस्थानांतील बहुतक सर्व वर्तमानपत्रांत त्या त्यावेळीं प्रसिद्ध झालीच आहे; पण वर्तमानपत्रें चिरकाल राहण्याचा संभव कमी असल्यामुळें ती साग्र हकीकत पुस्तकरूपानें प्रसिद्ध करून चिरकाल राहील, असें करावें, हा विचार सुमारें एक वर्षापूर्वीं माझ्या मनांत आला, पण वांईकरांना छळण्याचें शेंपूट कांहीं केल्यानें संपेना व आरोपीपैकीं श्री पंत व रा० पंडीत यांनीं सरकारावर लावलेल्या फिर्यादीचा निकाल लवकर लागेना, ह्मणून तो विचार हा कालपर्यंत तहकूबच ठेवावा लागला; आतां तें छळाचें शेंपूट बहुतेक संपल्यासारखें झालें आहे व श्री. पंत आणि रा. पंडीत यांच्याही फिर्यादींचा बरा वाईट निकाल लागला-तेव्हां हें पुस्तक लिहून छापण्याचें धाडस केलें आहे. या पुस्तकास **इतिहासाची पुरवणी** असें नांव दिलें आहे; याचें कारण इतकेंच कीं, या ५०.वर्षांचा महाराष्ट्रदेशा-चा साग्र इतिहास लिहिण्याचें जर कोणी मनांत आणलें-तर त्यांस वांईस झालेल्या अन्यायाचा व जुलमाचा इतिहास त्यांत सामील केलाच पाहिजे; सबब या वांईप्रकरणासंबंधीं हकीकत एके ठिकाणीं जमविण्यास त्यास अडचण व त्रास पडूं नये, म्हणून ही त्या **इतिहासाची पुरवणी** प्रसिद्ध करून ठेविली आहे.

या पुस्तकांत जितकी हकीकत देतां अली, तितकी देण्याचा प्रयत्न केला आहे; विस्तार भयास्तव खटल्याचे निकालाच्या व जाहिरनाम्याच्या नकला व इतर मजेचे कागद देतां आले नाहींत, याबद्दल फार दिलगिरी वाटते. दुसरे त्या नकला विशेष महत्वाच्याही पण मला वाटल्या नाहींत. वाचकांना जिज्ञासा उत्पन्न झाल्यास त्यांनीं त्या मिळविण्या करितां तसदी घ्यावी, ह्मणजे मिळण्यासारख्या आहेत.

पुणें तारिख १ मार्च
सन १८९६.

पुस्तक कर्ता.

मराठी ग्रंथ संग्रहालय

# इतिहासाची पुरवणी.

अथवा

## वांईत द्वारासंबंधीं झालेल्या खटल्यांतील जुलमाचें व अन्यायाचें प्रदर्शन.

आमच्या हिंदुस्थान देशांत अनेक धर्मांचे, अनेक जातींचे, पंथांचें, व भिन्न भिन्न रितिरिवाजांचे लोकांचा भरणा आहे; त्यांत हिंदुधर्मी लोक जास्त आहेत. हिंदुस्थान देशांतील संपत्तीला, हवापाण्याला व सुपीकतेला भुलून परकीय देशांतील लोकांनीं इकडे वसाहतीस येण्याची इच्छा करणें साहजिकच आहे, त्यांनीं या देशांत स्वतःची स्थावर जंगम मिळकत असावी, अशी आशा धरणें उक्त आहे व त्याकरितां लढाया, खून, मारामाऱ्या लुटालुटी, फसवाफसवी इत्यादिकांचा अवलंब करणें हेंही स्वाभाविक आहे. आमच्या देशावर स्वामित्वाची इच्छा करणारे जे अनेक परकीय लोक होते व आहेत, त्यांपैकीं इच्छा तृप्त झालेले मुसलमान व ज्यांची इच्छा सांप्रत तृप्त होत आहे, ते इंग्रज लोक होत. सुमारें एक हजार वर्षांपूर्वी मुसलमानांनीं हिंदुस्थानच्या वायव्य प्रांतांकडून इकडे येण्याचा उपक्रम केला व जे इकडे आले, त्यांपैकीं बहुतेक इकडचेच रहिवासी झाले; म्हणजे मुसलमान लोकांचा व आपला आज एक हजार वर्षांपा-

मून सहवास आहे. पूर्वी हिंदु-मुसलमानांनीं अनेक लढाया केल्या, लाखों प्राण्यांचे जीव घेतले व एकमेकांवर वर्चस्वही मिळविलें; सांप्रत दोघांचाही वर्चस्वपणा रसातळाला भिडून तिसऱ्यांनींच दोघांच्या उरावर दडपण ठेविलें आहे; सारांश, हिंदु व मुसलमान या उभय जातींतील रग जिरली जाऊन ते गोगलगाय बनले आहेत; तेव्हां त्या उभयतांनीं एक मतानें व एक दिलानें वागून या तिसऱ्याच्या अमलांत आपल्या हक्काला जागून येणारे दिवस ढकलणें योग्य आहे व त्याप्रमाणें या दोन्ही जाती वागतही होत्या, असें ह्मणण्यास विशेषशीं हरकत दिसत नाहीं; पण इ. स. १८९३ सालापासून या दोन जातींतील प्रेम द्विधा झालें. प्रथमतः ब्रम्हदेशांत रंगून मुक्कामीं बकरीईद सणाचे वेळीं अगदीं क्षुल्लक कारणावरून तेथील हिंदु-मुसलमानांत भांडण होऊन खून पडले. त्यानंतर थोडेच दिवसांनीं मोहरमचे सणांत गुजराथेंत प्रभासपट्टण मुक्कामीं या उभय जातींत खडाजंगी मारामारी होऊन १०।१२ खून झाले; यानंतर लवकरच मुंबई मुक्कामीं तर हिंदु-मुसलमानांत सतत ३ दिवसपर्यंत केवढें रण माजलें होतें, हें सर्वांस विदीत आहेच. यानंतर येवल्यास तोच प्रकार झाला; खानदेशांत एक दोन ठिकाणीं असेंच झालें; पुणें मुक्कामींही मारामाऱ्या होऊन तेथील हिंदु-लोकांस स्मरण राहील, असा प्रकार घडला; सारांश, तुम्ही आमच्या मशिदीवरून वाजवूं नका, इत्यादि वाद्याच्या क्षुल्लक कारणावरून या दोन्ही जाती इ. स. १८९३ सालापासून आपला द्वेष उघड करूं लागल्या. सध्यां त्याला जरी सौम्य स्वरूप आ

त्यासारखें दिसत आहे, तरी या दोन्ही जातींतील लोकांची मनें परस्पर शुद्ध होण्यास आणखी कांहीं काल तरी लोटला पाहिजे.

येथें आह्मी जी हकीकत देण्याचें योजलें आहे, तें वांई प्रकरण होय, हें प्रस्तावनेवरून वाचकांना कळलेंच असेल. प्रभासपट्टण, मुंबई, येवले, पुणें इत्यादि ठिकाणीं जे प्रकार झाले; त्यांशीं आमच्या वांई प्रकरणाचा बिलकुल संबंध नाहीं. वांई प्रकरणाची जशी विस्तारानें हकीकत प्रसिद्ध व्हावयाला पाहिजे होती, तशी प्रसिद्ध न झाल्यामुळें कित्येक लोकांचा मोठा गैरसमज झाला आहे. त्यांना असें वाटतें कीं, जसा मुंबई, पुण्यास दंगा झाला, तसाच वांईसही झाला व वांईत शिक्षा झालेले लोक त्या दंग्यांतील होत; पण खरा प्रकार तसा नाहीं. वांईस हिंदु–मुसलमानांत दंगा झाला नाहीं, इतकेंच नव्हे; पण या दोन जातींत रागाची बोलाचाली सुद्धां अद्याप झाली नाहीं. वांईतील मुसलमान हिंदूशीं उघड द्वेष करीत नाहींत, मात्र गुप्त रीतीनें त्यनीं द्वेष केला असेल, तर ठाऊक नाहीं. इतर ठिकाणीं झालेल्या व वांईतील प्रकारांत जो मोठा भेद आहे, तो वरील होय. वरीलप्रमाणें गैरसमज असल्याचें आह्मांला अनेक ठिकाणीं आढळून आल्यामुळें आरंभीं हा खुलासा करणें भाग पडलें, तो भेद वाचकांनीं लक्षांत ठेऊन पुढील हकीकत वाचण्यास आरंभ करावा, ह्मणजे वांईतील सद्गृहस्थांवर कसा गहजप गुदरला होता, हें कळून येईल.

**श्रीक्षेत्र वांई** हा गांव सातार जिल्ह्यांत श्रीकृष्णा नदीचे उत्तर तटाकीं आहे. येथली लोकसंख्या १२०००

वर आहे. बहुतेक वस्ती हिंदूंचीच असून ब्राह्मण समुदाय मोठा आहे. मुसलमानांची वस्ती फारच थोडी असून त्यांपैकीं बहुतेक हिंदूंच्याच आश्रयानें रहातात. या क्षेत्रास सदर्न मराठा रेल्वेचें वाठार स्टेशन नजिक आहे. हा गांव महाबळेश्वराच्या अगदीं रस्त्यावर असल्यामुळें या प्रांतांत येणाऱ्या बहुतेक युरोपियन लोकांना व अधिकाऱ्यांना याची माहिती आहे. येथील लोक धार्मिक आहेत. याशिवाय वांईक्षेत्रासंबंधीं जास्त वर्णन देण्याची येथें जरूर नाहीं, असें आम्हास वाटतें.

येथपर्यंत उपक्रमादाखल जें लिहिणें अवश्य वाटलें, तें लिहिलें. आतां वांईतील सद्गृहस्थांवर अन्यायानें जो प्रसंग आणला गेला, त्याच्या मुळाशीं तेथें दरसाल निघणारी गणपतिचीं द्वारें ऊर्फ मेळे आहेत. वांईस दरवर्षी भाद्रपद शुद्ध १ पासून ४ पर्यंत 'द्वारें' म्हणून चार दिवस टोलेजंग समारंभ होत असतात. इतर ठिकाणच्या लोकांना द्वारें म्हणजे काय? हें विशेषसें माहीत नाहीं, कारण हे असे समारंभ या दिवसांत या प्रांतांत दुसरीकडे कोठें होत असल्याचे प्रसिद्ध नाहीं. हीं द्वारें वांई मुक्कामीं केव्हांपासून व कां होऊं लागलीं, याचा इतिहास उपलब्ध नाहीं, यावरून हीं फार प्राचीन आहेत, असें अनुमान होतें. या क्षेत्राच्या पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर या दिशांकडे अनुक्रमें ओझर्डें, बावधन, धोम व पालपेश्वर हीं चार खेडीं आहेत. तेथें गांवांतील सर्व पेठचीं मुलें व प्रौढवयाचे लोकही प्रातःकाळीं शुचिर्भुत होऊन सोवळ्यानें जातात. यांचा थाट म्हणजे नेसायाचें धोतर, अंगावर पांघरण्याकरितां

एक पितांबराचें फडकें, खाकेंत फराळाचें गाठोडें व हातांत शेवटीं रेशमी गोंडा लावलेली एक बारीक वेताची कांठी; इतकाच असतो. जातांना पेठापेठाचीं मुलें जातात व तेथें गेल्यावर देवी गणपती वगैरे ग्रामदेवतांचीं दर्शनें घेऊन वनभोजन केल्यानंतर सायंकाळीं तेथून परत येतात; येतांना सर्व जमून येतात. वांईच्या शिवेपाशीं आल्यावर तेथें गांवांतील मंडळी वाजंत्री, ताशे, ढोल, लेजम्या वगैरे घेऊन सिद्ध असतात, तेथून वाजत गाजत वांईक्षेत्रामध्यें ब्राह्मणशाई आळींत श्रीकृष्णानदीचे कांठावर ‘ जुना गणपति ’ म्हणून एक प्राचीन स्वयंभूस्थान आहे, तेथें दर्शनास येतात, व तेथें पूजा आरती वगैरे झाल्यावर सर्व लोक मुकाट्यानें आपआपल्या घरीं जातात. येणेंप्रमाणें चार दिवस चार समारंभ होतात. या द्वारांस, मेळ्यास ऊर्फ समारंभास तेथें जीं नावें आहेत तीं अशीं:—भाद्रपद शुद्ध प्रतिपदेस पूर्व दिशेचें ऊर्फ ओझर्ड्याचें द्वार, द्वितियेस दक्षिण दिशेचें ऊर्फ वाधवनें द्वार, तृतियेस पश्चिमेचें ऊर्फ धोमचें द्वार व चतुर्थीस उत्तरेचें ऊर्फ पालेश्वरचें द्वार. इतक्या वर्णनावरून वाईंत झालेल्या भयंकर प्रकाराचे मुळाशीं असलेलीं जीं द्वारें त्यांचें साधारण स्वरूप वाचकांच्या लक्षांत येईल.

वर सांगितलेल्या चार द्वारांपैकीं पूर्वेच्या व पश्चिमेच्या ह्मणजे अनुक्रमें पहिल्या व तिसऱ्या द्वारांचे समारंभ ज्या वाटेनें येतात, त्या वाटेनें मुसलमानांची मशीद आहे. पूर्व बाजूकडील मशिदीस जूम्मा मशीद व पश्चिमबाजूकडील मशिदीस * निमजगा म्हणतात व वांईतील सद्-

* यास मशिदीचें स्वरूप बिलकुल नाहीं. येथें मुसलमानांचीं थडगीं आहेत

गृहस्थांना ज्या शिक्षा झाल्या, त्यांचें मूळ या मशिदी होत. द्वारांचे समारंभ या मशिदीवरून आजपर्यंत सतत वाजत आले व खुद्द मुसलमानांनीं या मशिदीवरून न वाजविण्याबद्दल उघडपणें हरकत घेतल्याचें कोणास ठाऊक नाहीं. वहिवाटीस अनुसरून शके १८१६ चे भाद्रपदमासीं ह्मणजे इ. स. १८९४ चे सप्टंबर महिन्यांत द्वारें निघावयाचीं; पण द्वारें निघण्यापूर्वी फक्त २ दिवस सदर मशिदीवरून वाद्यें वाजवूं नयेत, अशा अर्थाचा जाहिरनामा त्यावेळच्या जिल्हा अधिकाऱ्यांनीं लावला, त्या जाहिरनाम्या विरुद्ध तक्रार करून तो जाहिरनामा रद्द करण्याकरितां व आपली अनादि वहिवाट चालूं ठेवण्याकरितां वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वांईकरांनीं दाद मागावयाची, पण द्वारांचे समारंभ अगदीं नजिक म्हणजे दोनच दिवसावर येऊन ठेपल्याकारणानें चालूं सालचे समारंभ जाहिरनाम्या बरहुकुम आटपून घेऊन नंतर दाद मागणें बरें असें वांईकरांस वाटून त्यांनीं तसेंच करण्याचें ठरविलें; व द्वारांचे दिवशीं जाहिरनाम्या प्रमाणें सदर दोनही मशिदीवरून सर्व वाद्यें बंद ठेऊन फक्त लहानशी एक झांज वाजवीत समारंभ साजरा करून घेतला. झांजेची गणना वाद्यांत आहे, व ती वाजविल्यास जाहिरनाम्याविरुद्ध वर्तन होतें, असा जर वांईकरांचा समज असतां अथवा जाहिरनाम्यांत त्यासंबंधीं स्पष्ट खुलासा केला गेला असतां, तर त्याविरुद्ध वर्तन करण्यास वांईकर खचित् धजावले नसतें, अशी आमची खात्री आहे.

या द्वारांचे समयीं वांईस रा. तुकाराम बहिरजी हे

फौजदारीचे हुद्यावर असून पोलिस इन्स्पेक्टरचे जाग्यां-
वर मि. दुल्लेखान नांवाचे मुसलमान गृहस्थ होते. पोली-
स इन्स्पेक्टरचें ठाणें नेहमीं जिल्ह्याचे ठिकाणीं ह्मणजे
साताऱ्यास असतें; पण या द्वारांच्या समारंभाचे बरेच
पूर्वीं सदर पोलीस इन्स्पेक्टरनीं वांईस ठाणें दिलें होतें.
चारी द्वारें समाप्त झाल्यावर सदर फौजदार व इन्स्पेक्ट-
र द्वयांनीं वांईच्या लोकांवर फिर्यादी करण्याचे मनांत
आणले व त्याची अम्मलबजावणीही लागलीच केली.
गांवांतील ठळक ठळक, सभ्य, प्रतिष्ठित व अब्रुदार अ-
से १४ लोक निवडून काढले व त्यांपैकीं कोणावर एक व
कोणावर दोन तर कोणावर तीन अशा फिर्यादी ठोठावल्या.
पहिली फिर्याद ओझरड्याच्या द्वाराची, दुसरी बावधनच्या
द्वाराची व तिसरी धोमच्या द्वाराची होय. फिर्यादींत एकंदर
आरोप दोन होते. १ हुकुम अमान्य करणें, व २ रा
हुकुम अमान्य करण्यास उत्तेजन देणें. ओझरड्याच्या
द्वाराचे वाटेवर म्हणजे पूर्वेकडून गांवांत शिरल्याबरोबर
जुम्मा मशीद लागते, त्या ठिकाणीं झांजा वाजविल्या
व वाजविण्यास उत्तेजन दिलें; ह्मणून १३ इसमावर फि-
र्याद केली; बावधनच्या द्वाराचे वाटेवर मशीद मुळींच
नाहीं, असें असून कांहीं तरी बादरायण संबंध लावून
वरील आरोप ठेऊनच ६ इसमावर फिर्यादी लावल्या;
तिसरें द्वार धोमचें; या द्वाराच्या वाटेवर निमजगा आहे.
येथें ही हुकुम अमान्य केला व उत्तेजन दिलें, यांच
आरोपावरून ६ इसमावर फिर्यादी लावल्या. येणें प्रमाणें
दोन आरोपांच्या तीन फिर्यादी एकंदर मिळून १४ अ-
सामीवर सदर पोलीस अधिकाऱ्यांकडून लावण्यांत आ-

ऱ्या. फिर्यादींची चवकशी करण्याकरितां फर्स्ट असिष्टंट कलेक्टर मि. केनडी हे सातान्याहून मुद्दाम वांईस आले व त्यांनीं फिर्यादी फैलावर घेऊन चवकशीस सुरवात केली; फिर्यादीतर्फे पोलीस प्रासिक्यूटर काम चालवीत होते व आरोपीतर्फे प्रथमतः सातारचे कांहीं हुशार वकील व नंतर पुण्यांतील रा. काशिनाथ परशराम गाडगीळ बॅरिष्टर हे काम चालवीत होते, या फिर्यादीचे चवकशीसंबंधानें विशेष हकीकत सांगण्यापूर्वीं त्यांत जोम कितपत होता, व त्या फिर्यादी लावण्यांत पोलीस अधिकाऱ्यांकडून अन्याय व चुका कशा झाल्या होत्या, हें प्रथमतः थोडक्यांत सांगून नंतर पुढील हकीकतीकडे वळूं.

पहिली फिर्याद–ओझरड्याच्या द्वाराची, ही एकंदर १३ असामीवर लावण्यांत आली होती. त्यांचीं नांवें:–१ विश्वनाथ हरी कोठावळे, २ गोपाळराव तात्या ढवळेकर ३ विनायक अमृत ऊर्फ तात्या साइच पंत देशपांडे, ४ हरी बाबाजी पुरोहित, ५ अंताजी गंगाधर जोशी, ६ वासुदेव बाबूराव पंडित, ७ रामकृष्ण माधवराव वैद्य, ८ त्रिंबकराव हुशिंग, ९ गंगाधरराव तात्यासाहेब गाडगीळ, १० वामन बजाजी कुळकर्णी, ११ खंडेराव दत्तात्रय वाकडे, १२ जनार्दन आप्पाजी एरंडे; १३ रामकृष्ण बळवंत लेले.

दुसरी फिर्याद–बावधनच्या द्वाराची. हींत एकंदर सहा आरोपी करण्यांत आले होते त्यांचीं नांवें:–विश्वनाथ हरी कोठावळे, २ त्रिंबकराव हुशिंग, ३ बाळकृष्णपंत तात्या ढवळेकर ४ विनायक अमृत ऊर्फ ता-

ठाणे.

त्यासाहेब पंत देशपांडे, ५ वामन बजाजी कुळकर्णी ६ खंडेराव दत्तात्रय वाकडे.

तिसरी फिर्याद—धोमच्या द्वाराची. हींत सहा असामीवरच फिर्यादी लावण्यांत आल्या होत्या. त्यांचीं नांवें:—१ विश्वनाथ हरी कोठावळे, २ त्रिंबकराव डुशिंग, ३ विनायक अमृत ऊर्फ तात्यासाहेब पंत. ४ बाळकृष्णपंत तात्या ढवळेकर ५ वामन बजाजी कुलकर्णी ६ रामकृष्ण माधवराव वैद्य.

येणेंप्रमाणें तीन फिर्यादी होत्या. या फिर्यादींत इन्स्पेक्टर साहेबांनीं गांवांतील ठळक ठळक लोकांचीच नांवें दाखल केलीं होतीं. सदर १४ असामीशिवाय वाईक्षेत्रांत मोठा मनुष्य नाहींच ह्मटलें तरी चालेल. जे कांहीं आहेत, त्यांचीं नांवेंही त्यांत दाखल व्हावयाचीं; पण त्यांपैकीं कोणी परगांवीं त्यावेळीं गेले होते ह्मणून, कोणी अजारी होते म्हणून व कोणी अन्य कांहीं कारणानें वगळलें गेले ! ! हें क्षेत्रस्थांचें मोठें भाग्यच म्हणावयाचें. तिन्ही खटल्यांत फिर्यादीतर्फें जे साक्षीदार देण्यांत आलें होते; ते बहुतेक पोलीस, मुसलमान व सरकारी कामगार होते, तेव्हां त्यांच्या साक्षी आरोपीस विरुद्ध होणें अगदीं साहजिक आहे. त्यांतूनही ज्यांची साक्ष आरोपीला कांहीं ठिकाणीं अनुकूळ झाली, त्यांच्या साक्षीवर माजिस्ट्रेट मि. केनडी यांनीं बिलकूल भरंवसा ठेविला नाहीं. आरोपींनीं आपले जबाब व पुरावा अगदीं सरळ दिला होता. त्यांत लपंडाव अथवा असत्याचा अगदीं लेशही नव्हता, हे आरोपींनीं आपलें म्हणणें जे कोर्टास

कळविले व ज्याचा समावेश कोर्टानें आपल्या ठरावांत केला आहे, त्यावरून कळून येईल. आरोपींनीं तिन्ही खटल्यांत पुढील मुद्दे कोर्टास कळविले—

१. डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट यांचा हुकूम सततचा असल्यामुळें आणि कोणत्याहा विशेष समारंभासंबंधानें नसल्यामुळें तो कायदेशीर हुकूम नाहीं. २. फिर्यादीतर्फेचा पुरावा मुसलमान व पोलीस यांचा असल्यामुळें व ख्रिश्चन लोकांच्या ( कांहीं ख्रिश्चन लोकांच्या व बायांच्याही साक्षी या खटल्यांत झाल्या होत्या ) तिऱ्हाईत पुराव्याशी त्याचा विरोध येत असल्यामुळें तो अविश्वसनीय आहे. ३.फिर्यादी तर्फेचा पुरावा परस्पर विरोधी आहे व त्यांत साक्षीदारांस शिकविल्याचें स्पष्ट दिसत आहे. ४ आरोपी सर्व वेगवेगळ्या ठिकाणीं होते, ५. या समारंभाची वहिवाट अशी आहे कीं, त्यांत सर्व आरोपी होते, असें जरी मानलें, तरी पुढील मेळ्यामध्यें ( जेथें वाद्यें झांज वाजत होतीं तेथें ) असणें बिलकूल शक्य नाहीं. ६. हुकुमाची अमान्यता अगदीं क्षुल्लक प्रकारची आहे; सबब थोडी शिक्षा तिला बस्स आहे. हे मुद्दे पहिल्या खटल्यांतील होत. दुसऱ्या खटल्यांत आरोपींनीं पहिल्या खटल्यांतील वर लिहिलेले तीन मुद्दे कळवून आणखीही कळविलें होतें कीं, मेळ्याबरोबर कोणीही आरोपी नव्हते. तिसऱ्या खटल्यांतील मुद्दे पहिल्या खटल्यांपेक्षां फारसे निराळे नव्हते. सारांश, आरोपी लोकांनीं एक अक्षरही खोटें सांगितलें नाहीं, हें त्यांनीं कोर्टास कळविलेल्या मुद्यावरूनच वाचकांस कळून येईल. तिन्ही खटल्यांत पोलिसांनीं निव्वळ जुलूम, अन्याय व

जबरदस्ती या तीन गोष्टींशिवाय कांहीं एक केलें नाहीं. या खटल्यांतील पहिला व शेवटचा ह्मणजे अझरड व धोम या द्वारासंबंधीं खटले कदाचित् संभवनीय होतील, पण बावधनच्या द्वारासंबंधीं खटला करण्यांत पोलीस इन्स्पेक्टर दुल्लाखान यांनीं ज्या ढोबळ चुका केल्या, त्या पाहिल्या म्हणजे वांईच्या खटल्याचें साधारण स्वरूप वाचकांच्या झटदिशीं लक्षांत येईल, सबब त्यासंबंधीं थोडीशी हकीकत येथें देतों:—

बावधनचें द्वार भाद्रपद शुद्ध २ चें होय. बावधन हा गांव वांई क्षेत्राचे दक्षिणेस आहे. द्वाराच्या समारंभास ह्मणजे वाद्यें वगैरे वाजत गाजत समारंभ येण्यास श्रीकृष्णा नदीस जो पूल आहे, त्या पुलापलीकडे ह्मणजे पोष्ट ऑफिसाजवळ सुरवात होते. पूर्वीं सांगितलेच आहे कीं, द्वाराच्या समारंभाचा शेवट जुन्या गणपतीचे दर्शनानंतर होतो. शके १८१६ सालीं बावधनचें द्वार वाजत गाजत जुन्या गणपतीला गेलें व तेथें त्याची परिसमाप्ती झाली; व मेळेवाले लोक आपापल्या घरीं गेले. बावधनच्या द्वाराच्या तंट्याची जागा निमजगा होय व हा निमजगा बावधनचें द्वार ज्या रस्त्यानें वाजतगाजत जाते, तेथपासून पाव मैलावर आहे. या द्वाराचे खटल्यांत जे आरोपी करण्यांत आले होते, ते सर्व गांवच्या पूर्व बाजूस ह्मणजे जुन्या वांईत रहाणारे होते. निमजगा पश्चिमेकडे आहे, त्यांच्या घरापासून निमजगा अर्धा मैलावर आहे, असें असून या खटल्यांतले सर्व आरोपी जे त्यावेळीं निमजग्यावर येण्याचा संभवही नाहीं, असें आहेत. तेव्हां वांईचे खटले निव्वळ द्वेषबुद्धीनें के.

ठेले, असें कां म्हणूं नये ? या फिर्यादीची चवकशी कर- णारे मि. केनडी माजिस्ट्रेट यांना ही गोष्ट माहीत न- व्हती, असें नाहीं. या खटल्याच्या ठरावांत ते स्पष्ट म्हणत आहेत कीं; 'नेहमींची वहिवाट अशी आहे कीं, पूल ओलांडून हा सर्व समुदाय गांवांत आला म्हणजे थोरल्या रथापाशीं तो फुटतो व पूर्वेकडील मंडळी वाई वाठार रस्त्यानें जातात व जुन्या गणपतीचें दर्शन घेतात व पश्चिम भागची मंडळी कृष्णानदीचे कां- ठावरील ढोल्या गणपतीस जातात व तेथून आपापल्या घरीं निघून जातात या नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें फक्त गंगापुरीच्या मेळ्यासच कायतें निमजग्यावरून जावें लागतें. या गोष्टी उभयपक्षींही कबूल झालेल्या आ- हेत.' अवतरणांतील वाक्यें चौकशी करणाऱ्या मा- जिस्ट्रेटनींच या खटल्याच्या अखेर ठरावांत लिहिली आहेत. यासंबंधानें आम्ही स्वतंत्र टीका न करितां वाई येथें निघणाऱ्या 'मोदवृत्त' पत्रांतील उताराच येथें सादर करितों, म्हणजे झालें. मोदवृत्त कर्ते या खट- ल्याच्या ठरावावर टीका करतांना म्हणतातः—"निज- मजग्यावर हिंदूंनीं वाद्यें वाजविलीं म्हणून दुसरा खटला उभारलेला होता. "नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें फक्त गंगापुरीच्या मेळ्यासच कायतें निमजग्यावरून जावे ला- गते" ही गोष्ट केनडीसाहेबांच्या ठरावामध्यें कबूल केलेली आहे, यावरून जाणून बुजून नसता खटला जरी झाला, तरी तो गंगापुरीच्या मेळ्यावरच होण्याचा संभव असणार, परंतु या खटल्यामध्यें जे आरोपी होते त्यांपैकीं एकही गंगापुरींतला नाहीं, इतकेंच नव्हे, परंतु

गंगापुरीचे शेजारी असलेली मधली आळी, मधली आळीचे पलीकडे असलेली गणपती आळी आणि गणपती आळीचेही पलिकडे असलेली धर्मपुरी या पेठांपैकीं एकही नसोन सर्व आरोपी त्या चारी पेठांच्या पलीकडले [ म्हणजे मुसलमानांची वस्ती ज्या भागासमीप आहे, व म्हणूनच ज्या भागांत राहणाऱ्या कोणत्याही ठळक मनुष्याचें नांव आरोपींत आलें असतें तर मुसलमान साक्षीदारांची त्याला ओळखायासंबंधानें वगैरे चूक होण्याचा झोंपेंतसुद्धां संभव नाहीं, त्या भागांतले ] आहेत.

तेव्हां गंगापुरीचा मेळा म्हणजे गांवच्या पश्चिम बाजूचा मेळा वाजत नेण्याकरितां गंगापुरीच्या अगर त्यांचे शेजारच्या तिन्ही पेठांतील लोकांनीं खटपट मुळींच न करितां गांवच्या पश्चिम भागांतील ( हा शब्द मोदवृत्तांत चुकीनें पडला आहे, तेथें पूर्वभागांतील असें पाहिजे ) लोकांनीं कोणी वाजविण्याची व कोणी मदत करण्याची म्हणून खटपट केली, इतकी गोष्ट केनडी साहेबांच्या ठरावान्वयें "....करून येईल. अस्तु; खटल्याची चवकशी करीत असतां माजिस्ट्रेट मि. केनडी यांनीं आपली वागणूक फार शांतपणाची ठेविली होती. आरोपींशीं कोणत्याही प्रकारचें उद्धट वर्तन व त्यांचा मान कमी होईल, अशा प्रकारची वागणूक त्यांच्या हातून झाली नाहीं; इतकेंच नव्हे, पण ती त्यांची वागणूक 'मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदयेतु हलाहलं' याप्रमाणें होती, असें मागाहून कळून आलें. असो, अशा प्रकारें चौकशी आटोपून निकालावर खटला तहकूब राहिला.

मुसलमान पोलीस इन्स्पेक्टर दुल्लेखान व हिंदु फौजदार तुकाराम वहिर्जी यांनीं वांईतील ज्या ज्या सद्गृहस्थावर फिर्यादी लावल्या, त्यांपैकीं कित्येक द्वारांच्या समारंभाचे वेळी हजर नव्हते व जे थोडेसें होते त्यांपैकीं कित्येकांचा तर मेळेवाल्याशीं बिलकूल संबंध नव्हता. मौज पहाण्यास जसे हजारों लोक जमले होते, त्यांत तेही होते. झांज 'वाजवा, वाजवा' असें त्यांना ह्मणण्याचें कारण नव्हतें, अथवा 'वाजवूं नका' असें ह्मणण्याचीही त्यांना जरूर नव्हती. जी चौकशी झाली, त्यावरून फिर्यादीतर्फे पुरावा कच्चा होता, हें कोणीही कागदपत्र पाहिले तरी म्हणेल. आरोपींना तुरुंगवास भोगावा लागेल, ही कल्पना सुद्धा लोकांच्या मनांत नाहीं. माजिस्ट्रेट साहेबांनीं अक्सानें शिक्षा चोपलीच तर हें प्रकरण दंडाचें पुढें जाईल, असें ह्मणण्यास कांहीं कारण नव्हतें, असो. भाद्रपद वद्य १३ शके १८१६ ता २७ सप्टेंबर सन १८९४ रोज गुरुवार उजाडल्या. माजिस्ट्रेट मि. केनडी यांनीं सकाळीं ८ वाजतां कोर्टाची वेळ ठरविली. इंग्रजी राज्यांत कोर्टाची वेळ ११ पासून ५ पर्यंत ठरली गेली असून आज माजिस्ट्रेट साहेब ८ वाजतांच कोर्ट उघडतात याबद्दल आरोपींना व सर्व लोकांना मोठें आश्चर्य वाटलें; पण सरकारी अधिकाऱ्यांचा हुकूम आलेला, अमान्य केला तर पुन्हां खटले होण्याचा संभव जाणून सर्व आरोपी सकाळीं ८ च्या पूर्वींच साहेबांच्या कचेरींत हजर झाले. कैदेची शिक्षा होणार, ही कल्पना नसल्यामुळें सर्व लोक उपाशीच गेले होते. कित्येकांचें शौचमुखमार्जन विधीसही ठिकाण नव्हता; स-

काळचे आठ वाजले. माजिस्ट्रेट साहेब स्थानावर येऊन बसले. सावाच्याहून आदलेच दिवशीं बोलाबलेली पोलिसची पार्टी जय्यत उभी केली व पुढील भयंकर निकाल सांगितला.

१ श्रीमंत गंगाधरराव अप्पाजी ऊर्फ तात्यासाहेब गाडगीळ जाहागिरदार, अक्कलकोट संस्थानचे दिवाण व सेकंड क्लास सरदार यांस पहिल्या खटल्याबद्दल २१ दिवसांची कैद; २ श्रीमंत विनायकराव अमृत ऊर्फ तात्यासाहेब [illegible] देशपांडे राजाज्ञा, म्युन्सिपल कमिशनर, डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचे मेंबर, वांई म्युन्सिपालिटीचे माजी व्हाईस प्रेसिडेंट यास पहिल्या खटल्यांत २१ दिवसांची कैद व दुसऱ्या खटल्यांत ४० रुपये दंड अगर २१ दिवसांची कैद होऊन तिसऱ्या खटल्यांत त्यास दोषमुक्त केले. ३ रा. हरी बावाजी पुरोहित सावकार, म्युन्सिपल कमिशनर, म्युन्सिपालिटीचे चेअरमन, वांई सार्वजनिक सभेचे व वक्तृत्वोत्तेजकसभेचे सेक्रेटरी यास पहिल्या खटल्याबद्दल २१ दिवसांची कैद झाली. ४ अनंतराव गंगाधर जोशी हुंडीवाले, सावकार, म्युन्सिपल कमिशनर व वांई न्यू इंग्लिशस्कूलचे मुख्य चालक यांस पहिल्या खटल्यांबद्दल २१ दिवसांची कैद झाली. ५ रा. रामकृष्ण बळवंत लेले सरकारानियुक्त माजी म्युन्सिपल कमिशनर व वांई न्यू इंग्लिश स्कुलचे हेडमास्तर यांस पहिल्या खटल्याबद्दल २१ दिवसांची कैद झाली. ६ रा. वासुदेव बाबूराव पंडित सावकार, म्युन्सिपल कमिशनर यांस १ ल्या खटल्याबद्दल २१ दिवसांची कैद झाली. ७ रा. रामकृष्ण माधवराव ऊर्फ नानासाहेब

वैद्य इनामदार, कन्सिलिएटर, लोकलबोर्डाचे चेअरमन, सरकारनियुक्त माजी म्युन्सिपल कमिशनर व वांई सार्वजनिक सभेचे माजी सेक्रेटरी यास पहिल्या खटल्यांत दोषमुक्त करून तिसऱ्या खटल्यांत एक महिन्याची कैद दिली गेली. ८ रा. खंडेराव दत्तात्रय वाकडे इनामदार यांस पहिल्या खटल्याबद्दल २१ दिवसांची कैद व दुसऱ्या खटल्याबद्दल ४० रुपये दंड अथवा २१ दिवसांची कैद अशी शिक्षा झाली ९ रा. जनार्दन आप्पाजी एरंडे इनामदार यास पहिल्या खटल्यांत २१ दिवसांची कैद झाली. १० रा. विश्वनाथ हरी कोठावळे यांस पहिल्या खटल्यांत १५ दिवसांची कैद, दुसऱ्या खटल्यांत २५ रुपये दंड अगर तीस अठवडे कैद होऊन तिसऱ्या खटल्यांत २१ दिवसांची कैद झाली. ११ रा. गोपाळरावजी तात्या ढवळेकर यास पहिल्या खटल्यांत १५ दिवसांची कैद झाली. १२ रा. बाळकृष्णपंत तात्या ढवळेकर यास दुसऱ्या खटल्यांत ४० रुपये दंड अगर २१ दिवसांची कैद व तिसऱ्या खटल्यांत १ महिन्याची कैद झाली. १३ रा. वामन बजाजी कुळकर्णी यांस पहिल्या खटल्यांत २१ दिवसांची कैद, दुसऱ्या खटल्यांत ४० रुपये दंड अगर २१ दिवसांची कैद व तिसऱ्या खटल्यांत १ महिन्याची कैद झाली.

शिक्षा झाल्याची बातमी हालोहाल सर्व गांवांत पसरली, त्याबरोबर सर्व वांई क्षेत्राची जी स्थिति झाली, ती वर्णन करण्यास आजही ही एकमति लेखणी असमर्थ आहे, सबब त्या स्थितीचें वर्णन तेथें त्यासंबंधी नि-

झालेल्या मोदवृत्त पत्रांत जें आलें आहे, त्याचेंच अ-
वतरण येथें करितों.–

## अन्याय !! अन्याय !!!

# अन्याय !!!

"सर्व क्षेत्रस्थांच्या सुखाकरितां झटणारे, बुडत्यास
हात देणारे; शरणागतांचें रक्षण करणारे व आपलें सर्व
आयुष्य लोकोपयोगार्थ खर्च करणारे, असे जे निरपराधी,
निरुपद्रवी, अनुदार, व प्रतिष्ठित वांईतील थोर थोर
गृहस्थ यांच्यावर मुसलमान पोलिस इन्स्पेक्टर दुल्ले-
खान यांनीं ज्या निष्कारण फिर्यादी केल्या होत्या,
त्यांचा निकाल आज सकाळीं ८ वाजतां फर्स्ट अ. कले.
मि. केनडी यांनीं सांगितला. निकाल सांगितल्याबरोबर
५ मिनिटांच्या आंत वाईतील १२००० हिंदुलोकांच्या
डोळ्यांतून दळदळा पाणी गळूं लागलें आहे; शाळेंत जाणारीं
मुलें आक्रोश करीत आहेत घांटांवर स्नान संध्या करीत बस-
लेले शेंकडों ब्राम्हण ऐकण्याबरोबर मूर्छा येऊन पडत
असलेले प्रत्यक्ष दृष्टीं पडत आहेत; सर्व सुवासिनी कुमा-
रिका आणि वृद्ध स्त्रिया आपल्या रडण्यानें जिकडे ति-
कडे हलकल्लोळ करीत आहेत व बाजारांतून, देवालया-
तून आणि रस्त्यांतून जिकडे पहावें तिकडे सर्व लोक
आपल्या माना खालीं घालून वर्णन करण्यासही खरोखरच
अशक्य असें दुःख करित आहेत. मुसलमान इन्स्पे-

क्टर दुलेखान यांनीं जी नसती फिर्याद मोठमोठे लो-कांवर केली होती त्याचा निकाल फिर्यादी तर्फें पुरावा लक्ष्यांत घेतला असतां अशाप्रकारचा होईलसें कोणाच्या स्वप्नांतही आलें नव्हतें !

यांतील बहुतेक लोक थोर असल्यामुळें कित्येकांना कोस अर्धा कोस देखील पायानें जाण्याची संवय नाहीं; तथापि, त्यांनीं आपली शिक्षा भोगण्यास चालतच सा-तान्यास गेलें पाहिजे असा हुकूम झाला ! खटल्याची चौकशी मंगळवारीं पुरी होऊन आरोपीं तर्फें बॅरिस्टरचें बोल-णेंही आटपलें होतें; परंतु त्या दिवशीं निकाल न होतां आज सकाळीं आठ वाजल्याबरोबर ५ मिनिटांच्या आंत नि-काल होऊन झालेली शिक्षा २१ दिवसांत वगैरे १ प्रहर हीं कमी न होतां सर्वांस संपूर्णपणें भोगावी लागणार ! परवांचे दिवशीं संध्याकाळीं निकाल असतां तर ४ प्रहर तरी कमी झाले असतें, परंतु ते कमी झाले नाहींत. शिवाय परवां संध्याकाळीं निकाल झाला असतां तर हा-यकोर्टाकडे तावडतोब या अठवड्यांत अपील दाखल करून आरोपींस जामिनावर खुले करून घेण्याचा मार्ग होता; परंतु वांईस तार नसल्यामुळें व हायकोर्ट आतां सोमवारावांचून उघडणारें नसल्यामुळें तोही मार्ग सोम-वार पावेतों बंद झाला ! सातान्यास कांहीं कायदेशीर इलाज करून वरील मंडळी जामिनावर खुली हो-ण्याचा कांहीं यत्न झाल्यास तो करण्याकरितां कांहीं गांवांतील मंडळी ८॥ वाजण्याचे आंतच चालती झाली आहेत. या खटल्यांत फिर्यादी तर्फें ज्या साक्षी झाल्या त्यापैकीं दोन युरोपियन लोकांच्या, तीन ख्रिश्चन लोकां-

ध्या व मामलेदार आणि फडणीस या दोन सरकारी अं-
मलदारांच्या निरपराधी आरोपींना सर्वस्वी अनुकूल व
फिर्यादीतर्फेंञा अक्षरशः प्रतिकूल अशा झाल्या असतां-
नाही निकाल या प्रकारचा झाला ही गोष्ट विशेष लक्षांत
ठेवण्यासारखो आहे. **मुसलमान पोलिस इन्स्पेक्टर दुल्लेखान** यांच्या प्रतापानें हिंदूंच्या अन्नावर आजपर्यंत
पोसलेल्या व अन्नावर पोसत असलेल्या फिर्यादीतर्फे मन:-
पूत साक्षी देणाऱ्या वांईतील वगैरे **मुसलमान लोकांच्या**
करामतीनें आज जो हा अश्रुतपूर्व प्रसंग वांईतील १२०००
हिंदु लोकांवर गुदरला त्याचें दिग्दर्शनही करण्यास दु:-
खाश्रुनीं डोळे अंध झाल्यामुळें व हातांतील लेखणी गळत
असल्यामुळें आह्मी असमर्थ आहोंत. आम्हांस आई ब-
हिणीप्रमाणें असलेल्या सर्व हिंदु स्त्रिया आणि बापाभावां
प्रमाणें असलेले सर्व हिंदु लोक यांचें सांत्वन तरी को-
णत्या प्रकारानें करावें हें आम्हास समजत नाहीं। मोठ-
मोठ्या कुलीन व अब्रुदार लोकांवर विनाकारण आलेला प्रसंग
सोसण्यास सच्चिदानंद परमात्म्यानें कृपाळु होऊन त्यांना धैर्य
द्यावें येवेंढच आतां त्या प्रभूपाशीं आमचें मागणें आहे आणि
तें धैर्य त्यांचे अंगीं येऊन ते सुरक्षितपणें परत यावें
एतदर्थ सर्व क्षेत्रस्थांनीं परमेश्वराचें कांहीं तरी अनुष्ठान
एकसारखें सुरू ठेवावें अशी आमची सर्वांस प्रार्थना
आहे. गांवांतील तेरा लोकांवर विनाकारण हा भयंकर
प्रसंग मुसलमान पोलिस इन्स्पेक्टर यांनीं आणल्यामुळें
वांईतील सर्व १२००० च हिंदु लोक नव्हेत; परंतु कमी
अधिक मानानें २० कोट हिंदु लोक त्यांच्या दु:खाचे
वाटेकरी आहेत, असें समजून विनाकारण आरोपी के-

लेल्या थोर लोकांच्या भाउबंदांनीं, इष्ट मित्रांनीं, सो-यऱ्याधायऱ्यांनीं व आप्तगोतांनीं आपलें दुःख सोसावें. हरिश्चंद्र, धर्मराज, श्रीरामचंद्र यांच्यावर जसा प्रसंग आला होता, तसलाच प्रसंग या लोकांवर आला असल्यामुळें त्यांत त्यांना कोणताच कमीपणा नसून उलट हे लोक त्या हरिश्चंद्रादिकांप्रमाणें स्तुत्य होत येवढेंच सांगून लेखणी अडखळूंच लागल्यामुळें व डोळे पुसतां पुसतां सर्व वस्त्रही चिंब झालें असल्यामुळें या खटल्यांतील साक्षी पुरावा कसा काय होता तो आजच न सांगतां अंतःकरण कांहींसें स्वस्थ होईपर्यंत अवधीवर टाकून आम्ही पुरें करितों.

गांवांतील आणखी २७ हिंदूवर पोलिसांची धाड येण्याची वदंता आहे! ठीक आहे! राजानें मारल्याबद्दल व पावसानें भिजविल्याबद्दल उपाय चालत नाहीं, याचें प्रत्यंतर आज निकाल लागलेल्या खटल्यामध्यें अव्वलपासून अखेरपर्यंत बॅरिस्टर देऊनही जें आलें व मूळ फिर्यादी ६८ कलमाप्रमाणें असतांही लोकांना ज्या शिक्षा झाल्या त्या लक्षांत ठेवून आतां कोणाही हिंदूनें वकील अगर आपल्या तर्फे पुरावा देण्याचें भानगडींत पडूं नये; कारण; "बापावरी बाप गेला आणि सोंवळतां हात गेला" हें आजच निदर्शनास आलें आहे."

ही शिक्षा सांगितल्याबरोबर आरोपींस जामिनावर खुले करून हायकोर्टांत अपील करावें, असें वांईकारांतर्फे कांहीं मंडळी तावडतोब साताऱ्यास गेली; परंतु कांहीं एक उपयोग झाला नाहीं. इकडे माजिस्ट्रेट साहेबांनीं निकाल सांगितल्यावर त्यास पोलिसांनीं मामलेदार

कचेरींतील तुरुंगांत पोंचविलें; व ते विवशींचा त्यास प्रत्येकीं १८ पैप्रमाणें भत्ता देण्यांत आला; पण कोणाचींही मनें थाऱ्यावर नसल्याकारणानें आणलेल्या मिठाईपैकीं एक घांसही खपला नाहीं; तेव्हां पोलिसांचीच चंगळ उडाली. मॅजिस्ट्रेट या नंतर शहरांत हिंडण्यास निघाले व त्यांनीं म्युन्सिपालिटीचे प्रेसिडेन्ट या नात्यानें शहर सफाई कशी काय आहे, हें पाहिलें व आणखी कांहीं लोकांवर सार्वजनिक रस्त्यांत घाण केल्याबद्दल फिर्यादी करण्यास म्युन्सिपालिटीस फर्माविलें व बंगल्यावर निघून गेले. बरोबर बारा वाजले; सूर्याचें प्रखर ऊन बाहेर तोंड काढून देत नव्हतें, अशा वेळीं वांईतील तुरुंगांतून. सदर तेरा असामीस साताऱ्यास रवाना करण्याकरितां बाहेर काढण्यांत आलें. गाड्यांची परवानगी न हती; पण आरोपींपैकीं रा. रा. ढवळेकर यांच्या पायास कांही दुःख असल्यामुळें त्यांना एक पाऊलही टाकण्याची शक्ती नव्हती; तेव्हां निरुपाय म्हणून एक गाडीची परवानगी देण्यांत आली. आरोपी साताऱ्याच्या वाटेला लागले; तेव्हां एकदां रडण्याचा हलकल्लोळ उडाला. खरोखर पाषाण हृदयासही वांईची त्यावेळची स्थिती पाहून पाझर फुटला असतां; पण माजिस्ट्रेट साहेब त्यावेळीं त्याही पलीकडचे भासले. अस्तु.

मार्ग चालत असतां पोलिसांनींही त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची दयादृष्टी केली नाहीं; कित्येकांनीं तर हातांत बिड्या अडकवूं, म्हणून त्याच धमकीही दिली. दुसरे असिस्टंट पो. सुपरिंटेंडेन्ट मि. इंगल हे आणू

शनीप्रमाणेंच त्यांच्या पाठीमागें लागलें होतें असें दिसलें. पोलिस लोक यांच्यावर मेहेरनजर करीत आहेत काय ? हें पहाण्याकरितांच कीं काय कोण जाणे ? भरधांव घोडा टाकीत वांईहून त्याच्या पाठीमागें जात, व साताऱ्यास आरोपी लोक पोंचेपर्यंत इंगल साहेबांनीं अशा प्रकारें दोन तीन वेळेला तसदीही घेतल्याचें समजतें.

वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, तेरा असामींत एका आजारी मनुष्याकरितां एक बैल गाडी देण्यांत आली होती. दोन बैली गाडींत सरासरीनें ५।६ सडी माणसें बसतात, पण त्या गाडींत एका अजारी मनुष्याशिवाय इतरास बसण्याची मुळींच परवानगी नव्हती, बरोबर असलेल्या पोलिस लोकांपैकीं कित्येकांनीं त्यास आळी-पाळीनें बसण्याची परवानगी दिली; पण इंगल साहेब घोडा फेकीत केव्हा येतील याचा नेम नसल्यामुळें को-णीही गाडींत बसण्यास धजावेना ! ! अस्तु. मार्ग क्रमीत क्रमीत सूर्यास्ताचे सुमारास सर्व लोक सुमारें ८।१० मैल गेले नाहींत, तोंच पावसानें गाठलें. छत्र्या घे-ण्याची परवानगी नसल्यामुळें अंगावरील सर्व कपडे भिजून चिंब झाले. मि. इंगल साहेब पाठीमागून कदा-चित येतील, या भीतिनें पोलिस त्यांस झाडाखालीं निवाऱ्यासमुद्धां उभे राहूं देईना ! पावसाचा जोर उत्त-रोत्तर वाढतच चालला ! ! १० कदमाच्या पुढें रस्ता दिसेना ! ! ! वारा इतका सोसाट्यानें वाहत होता कीं, त्यांना अगदीं हींव भरलें. सकाळपासून पोटांत अन्न

नसल्यामुळें जीव बावरा झालेला, चालत असतां पाय अगदीं गळून गेलेले; त्यांत पोलिसचा इंगल साहेबांच्या भीतिनें होत असलेला जाच, असें चोहोंकडून त्यांच्यावर मोठें काहूर उसळलें. शिक्षा झाल्याचें दुःख बाजूला राहून सर्वांना आपल्या हतभाग्यतेबद्दलच जास्त दुःख वाटूं लागलें. असा प्रसंग हाडवैरी शत्रूवरही येऊं नये. रात पडल्यावर वाटेंतील उडतरे गांवच्या धर्म शाळेंत मुक्काम करण्याची मोठ्या जुलमानें परवानगी देण्यांत आली. अन्न नाहीं, पाणी नाहीं, वाचकहो, काय सांगू, कोरडें वस्त्रसुद्धां जवळ नव्हतें, मग हंतरूण पांघरूण कोठले ? तसेंच ओले कपडे अंगावर वाळविण्याचा प्रसंग आला. सर्वांना तेथेंच त्या धर्म शाळेंत केरांत नुसत्या जमिनीवर उघडे व ओलेत्यानें पडावें
५ लागलें. जे गुडगाभर उंचीच्या परांच्या गादीवर निजणारे व ज्यांना बाहेर जवळही कोठें जावयाचें असले तरी घोडा गाडी शिवाय होत नाहीं, त्यांना ९।१० मैल पायथ्या तोडीस यावे लागून एका रानांतील धर्मशाळेंत नुसत्या जमीनीवर उघडे बोडके, ओलेत्यानें कुडकडत पडण्याचा प्रसंग यावा व तोही या न्यायी व दयाळू ह्मणविणाऱ्या इंग्रज सरकारच्या राज्यांत निवळ अन्यायानें व द्वेषबुद्धीनें यावा, यापेक्षां दुसरी दुःखाची गोष्ट कोणती असावयाची ! त्यांनीं ती रात अशा स्थितींत आपल्या हतभाग्यतेचा विचार करीत काढली; यापेक्षां जास्त वर्णन करण्याची शक्ती आजही प्रस्तुत लेखकाची नाहीं. दुसरे दिवशीं सकाळीं पुन्हां मार्गक्रमण सुरू झालें. मध्यें एका विहिरीवर फराळ करून सर्व लोक सुमारें दोन-

प्रहरीं १।२ वाजण्याचे सुमारास साताऱ्यास जाऊन पोंचले. वांईहून साताऱ्याचे तुरुंगांत जाण्यास गांवाबाहे-रून रस्ता असूनही वांईतील प्रतिष्ठीत लोकांची धिंड सातारा शहरांतून काढण्यांत आली व अखेर गांवाबाहेर असलेल्या तुरुंगांत त्यांस पोंचविण्यांत आलें.

सदर तुरुंगावरील अधिकारी म्हणजे जेलर ब्राम्हण असून तो वांईजवळील पसरणीचा होता. सदर जेलरचे भाऊ आरोपीपैकीं कित्येकांचे खातेदार व कुळें होतीं; सदर मंडळीस पाहिल्याबरोबर जेलर साहेबांच्या डो-ळ्यांतून खळखळ अश्रू वाहूं लागले, पण करतो काय ? दगडासारखें मन घट्ट करून त्याला आपलें कर्तव्य बजावावें लागलें. सर्व आरोपी लोकांनीं जेलरास एक विनंती केली कीं, आमच्याकरितां तुह्मी किमपी दुःख करूं नये; मात्र आम्हा सर्वांस एकाच कोठडींत ठेव-ण्याची व्यवस्था करावी; यापेक्षां जास्त मागणी आमची तुमच्याजवळ नाहीं. एकंदर तुरुंगांत एकच कोठडी रिकामी आहे व तींतील जमिनीस अतिशय ओल आहे. असें जेलरनीं सांगितलें; पण तशी जागा यांनीं कबूल केली. ती कोठडी कितीही वाईट असो, आह्माला ती चालेल; असें सर्व आरोपींनीं सांगितलें तुरुंगांत शिर-ल्याबर कैद्यानें मोजमाप, शरीरावरील मुख्य खुणा, वजन व डाक्टरची परिक्षा, इत्यादि विधि व्हावा लागतो, तो झाल्यावर त्यास कोठडी दाखविण्यांत आली व सर्वही जण त्या कोठडींत शिरले व शिपायानें बाहेर कुलूप ठोकले. त्यावेळेस त्यांच्या मनाची स्थिती काय झाली असेल, वाचकहो याची तुम्हीच कल्पना करा.

मि. रँड त्यावेळचे असिस्टंट कलेक्टर, मि. फेनडो शिक्षा देणारे माजिस्ट्रेट, मि. इंगळ अ. पोलिस सु. मि. दुल्लेखान, व मि. तुकाराम वगैरे फिर्यादी व त्यांच्या हाताखालील पोलीस याप्रमाणेंच जर जेलर, डाक्तर व हुजुरडेप्युटी कलेक्टर येणेंप्रमाणें कैदी लोकांवरील अधिकारी जर निर्दय असते, तर आमच्या वांईकर लोकांच्या किती हालअपेष्टा झाल्या असत्या, त्याची कल्पनाही करतां येत नाहीं; पण वरील अधिकारी जात्याच सुस्वभावी, दयाळू व मनाचे कोमल असल्यामुळें सदर लोक तुरुंगांतून जिवंत बाहेर सुटले, ही आनंदाची गोष्ट आहे; पण मि. रॅन्ड प्रभृति लोकांनीं त्यांना तुरुंगांत घातल्यावरही त्यांच्यावरील वक्रदृष्टी कमी केली नाहीं. ते वारंवार तुरुंगांत येत व आपल्या बरोबर आणखीही कांहीं युरोपियन लोकांना आणीत व त्यांना हे आरोपी लोक दाखवीत असत. वांईतील कैद्यांना कैद्याचे पोशाख कां दिले नाहींत, म्हणून एक दिवस रॅन्ड साहेब जेलरवर संतापले; पण जेलरसाहेबांनीं, साध्या कैद्यांचे पोशाक बदलले नाहींत, तरी चालेल, अशा अर्थाचा एक सरकारी नियम जेव्हां त्यांच्या अंगावर फेंकला; तेव्हां कलेक्टर साहेबांचे तोंड उतरून ते निघून गेले, जर मि. रॅन्ड यांना वारिष्ठाप्रमाणें कायद्यांतील शब्दाचे अर्थ करण्याची विद्या अवगत असती तर अथवा तुरुंगावरील मुख्य अधिकार जर त्यांच्याकडे असता तर त्यांनीं त्या कलमाचा अर्थ आपल्याला पाहिजे तसा करून अथवा आपला अधिकार चालवून त्यांनीं या निरापराधी कैद्यांच्या गळ्यांत

ते स्वारींचे तीन कपडे ( टोपी, मांडचोळणा व सदरा ) खोवेत अडकवले असत, पण त्या दोहोंपैकीं एकही त्यांच्याजवळ नसल्यामुळें पाय आपटीत जाण्यापलीकडे त्यांचें कांहीं चालेना ! तुरुंगाच्या तटालाच लागून कांहीं उंच उंच झाडें आहेत, त्या झाडावर चढून तुरुंगांत कांहीं लोक टेहळताना दिसत असत; पण ते कशाकरितां तसें करीत असत, हें कळण्यास मार्ग नाहीं. या लोकांपैकीं कित्येक जन्माचेच अजारी अथवा नाजूक असल्यामुळें डाक्टर साहेबांच्या मेहेरनजरेनें दूध भात खाण्याची परवानगी मिळली होती.

एका जाग्यावर बसून दिवसचेदिवस काढण्याचे किती कठीण आहे, हें येथें सांगावयालाच पाहिजे, असें नाहीं; पण ही सर्व मंडळी एकेच ठिकाणीं असल्यामुळें दुःखानें कां होईना; पण यांचा वेळ गप्पा मारण्यांत जात असे; यांपैकीं कित्येक लोक विद्वान् असल्यामुळें नानाप्रकारच्या विषयावर वाद करण्यांत त्यांचा वेळ खर्ची पडे; व श्री. तात्यासाहेब पंत यांना गाण्याचा शौक असल्यामुळें त्यांचीही ते करमणूक करून घेत असत. असतु, अशा प्रकारें तुरुंगांत ते आपला काळ कावीत असत. १५ दिवसांच्या शिक्षेचे आरोपी रा. गोपाळराव दवळेकर हे प्रथमतः सुटले. नंतर २१ दिवस ज्यांना शिक्षा झाल्या होत्या, त्यांचे सुटण्याचे दिवस नजीक येऊन ठेपले; तेव्हां तुरुंगांतून सुटणाऱ्या वांईकर लोकांचें मोठ्या थाटानें स्वागत करून त्यांच्या दुःखास आपण वांटेकरी व्हावें; असें सातारकर लोकांस वाटून त्यांनीं त्यांच्या स्वागताची मोठी तयारी चालविली, पण

वाईतील सभ्य लोकांचें हात धुवून पाठीस लागलेले मि. रॅन्ड यांनीं २१ दिवसांचे कैदी सुटण्याच्या पूर्व दिवशीं रात्रीं १० वाजतां क्रि. प्रो. कोड कलम १४४ प्रमाणें वाईतील द्वाराचे प्रकरणांत शिक्षा झालेल्या लोकांना सातारा शहरांत सन्मानानें न नेण्याबद्दल जाहिरनामा लावला; सदर जाहिरनाम्यांत मि. रॅन्ड यांनीं 'समारंभ केल्यानें दंगा होण्याचा संभव आहे' असें विधान केलें आहे; पण दंगा करणारे कोण हें मात्र अद्याप लक्षांत येत नाहीं. मुसलमान लोक दंगा करतील, ही कायती भीति, पण सदर आरोपी लोकांस समारंभानें आणण्याच्या चळवळींत साताऱ्यांतील मुसलमान पुढाऱ्यांचेंही अंग होतें; हें आम्हास पक्कें ठाऊक आहे; पण त्यांना छळण्याचा ज्यांनीं निश्चय केला, ते आपल्या छळण्याच्या क्रमाशिवाय इतर गोष्टींचा विचार करतील कशाला ! या जाहिरनाम्यामुळें साताऱ्यांत यांच्या स्वागताची झालेली जय्यत तयारी व्यर्थ झाली; आतां या जाहिरनाम्याच्या तावडींत न सापडतां वाईकर लोकांचें दुःख परिमार्जन करण्यास सातारकर लोकांना अनेक मार्ग होते; पण तितकें मानसिक धैर्य सातारकर पुढाऱ्यांचे अंगांत नाहीं असें दिसलें. २१ दिवसांच्या शिक्षा झालेले ८ असामी सुटण्याचा दिवस उगवला, तेव्हां मागें राहिलेल्या ४ लोकांचें दुःख काय विचारावें ! सुटणाऱ्या ८ असामींचा पाय त्यांना मागें ठेवून बाहेर निघेना ! त्यांना असें वाटलें कीं, राहिलेल्या लोकांच्या शिक्षेचे दिवस जर हिस्सेरशीनें आम्हां सर्वांवर वाटून आम्हां सर्वांस आणखी कांहीं दिवस सरकार तुरुंगांत ठेवील व सर्वांना

एकदम सोडील, तर आह्मी कबूल आहों; पण त्यांच्या कबूलीप्रमाणें सरकारी कायदा नसल्यामुळें त्यांना मागें सोडूनच ८ असामींना तुरुंगाबाहेर पडावे लागले. राहिलेल्या चार असामींना त्या वेळेस किती दुःख झालें असेल व सुटणाऱ्यांना त्यांना मागें ठेऊन जाण्याबद्दल किती वाईट वाटलें असेल, त्याची कल्पना वाचकहो तुह्मींच करा. आरोपी तुरुंगांतून बाहेर पडल्या बरोबर पोलीसांनीं त्यास सातारा शहरांत जाण्याची मनाई केली व ८ हीं असामीस सातारा म्युन्सिपल हद्दीच्या बाहेर घालविले व पोलीस लोक परत आले. सुटलेल्या लोकांपैकीं कित्येकांचे साताऱ्यास इष्ट मित्र होते व कित्येकांचे नातेवाईक होते, व त्यांचा विचार त्यांच्या घरीं जेवण करून वांईस जाण्याचा होता, पण सरकारी अधिकाऱ्यांनीं त्यांच्या इच्छेस तुरुंगांतून सुटल्यावरही प्रतिबंध करून त्यांस उपाशीच सातारा शहराबाहेर परस्पर घालविण्यांत आले. येणेंप्रमाणें ज्याची ज्याची मुदत संपली, ते ते एका पाठीमागून एक त्या सजीव यमपुरींतून जिवंत बाहेर सुटले, हें त्यांचें, वाईकरांचें व याबरोबर सर्व हिंदुस्थानचें महत्भाग्यच समजलें पाहिजे.

कांहीं लोक शिक्षा भोगून तुरुंगांतून सुटून आले तरी हायकोर्टमध्यें केलेल्या अपीलाचा ऊर्फ तपासणी अर्जाचा निकाल लागला नाहीं; पण पुढें लवकरच त्याचा निकाल होऊन वांईकर सभ्य गृहस्थ अखेर हायकोर्टमध्येंही दोषी ठरले, हें लिहिण्यास परमावधीचें दुःख वाटतें. हायकोर्टमध्यें तपासणी होतांना आरोपी तर्फे वकिलास ज्या सवलती देणें अवश्य होतें, त्या न दिल्या-

मुळें ह्मणा, शिक्षा करणारे माजिस्ट्रेट व तपासणी अर्जा-
च्या निकाल लावणारे हायकोर्ट जज्ज यांचें नातें अस-
त्यामुळें ह्मणा, अथवा त्यावेळीं अन्याय देवतेचें जें पीक
आलें होतें त्याचा संस्कार हायकोर्ट जज्जांवरही झाला
होता ह्मणून ह्मणा, वांईतील गृहस्थांना झाले-
ल्या शिक्षा हायकोर्टांतही कायम होऊन इंग्रजी राज्यां-
तील न्याय देवतेची जागृति जितक्यास तितकीच अस-
ते, हें जगास व्यक्त करून दाखविण्यांत आलें.

आरोपी लोक तुरुंगांत असतांना हिंदुलोकांचें मुख्य सण दसरा व दिवाळी हे पडले होते, पण वांईतील लोकांनीं हे सण मुळींच केले नाहींत; सर्वांच्या मागून सुटलेले गृहस्थ रा॰ वामनराव कुळकर्णी हे जे दिवशीं सुटून वांईस येऊन पोचलें, ते दिवशीं वांईतील सर्व लोकांनीं आपापले सण साजरे केले, दिपोत्साह झाले व पानसुपाऱ्यांची तर खूपच गर्दी उडाली. यानंतर सर्व वांईकर लोकांची श्री. साठे यांचे धर्मशाळेंत जंगी जाहिरसभा रा. ब. जनार्दन सखाराम गाडगीळ बि. ए. एल्. एल्. बी. माजी हायकोर्ट जज्ज व नायब दिवाण बं. डोरे यांच्या अध्यक्षते खालीं भरली होती. यासभेंत त्या १३ असामींचें सांत्वन केलें जाऊन त्यांचा फार सन्मान केला, व त्यांस स्पष्टपणें कळविलें कीं, झालेल्या प्रकाराबद्दल तुम्ही कोणत्याही प्रकारें दुःख करण्याचें कारण नाही. तो प्रसंग तुह्मा १३ असामीवरचा नसून आम्हा सर्व वांईकर लोकांवरचा आहे, असें तुम्ही समजून स्वस्थ असावें. यानंतर मद्रास येथें भरणाऱ्या राष्ट्रीयसभेकरितां प्रतिनिधी निवडण्यासाठीं वांई-

तालुक्याची छोटी कॉंग्रेस भरली होती; त्यावेळेस लांबलांबचे लोक वांईतील लोकांचें सांत्वन करण्याकरितां मुद्दाम आले होते. मुंबई, पुणें, सोलापूर, धारवाड, मांगरवाडी ( लोणावळे ) इत्यादि ठिकाणीं जाहिरसभा भरून वांईकर लोकांस मानपत्रें देण्याचा समारंभ झाला. व त्या लोकांनीं या छोट्या कॉंग्रेसचे वेळीं समक्ष येऊन तीं मानपत्रें वांईकर लोकांस अर्पण केलीं.

वांईकर लोकांस तुरुंगांत पाठवून आमच्या सरकारी अधिकाऱ्यांचें मन शांत झालें नाहीं; ते त्यांना आणखी छळून दुःखावर डाग देण्याची संधी शोधूं लागले; व ती त्यांना सांपडली. तुरुगांत घातलेले बहुत लोक मोठ्यापैकीं असल्यामुळें त्यांचें नुकसान करण्यास त्या वेळचे सरकारी अधिकारी प्रवृत्त झाले. श्री. गंगाधरराव आपाजी गाडगीळ यांच्या सेकंडक्लास सरदारीवर पहिला हल्ला झाला व रा. रामकृष्णपंत ऊर्फ नाना सहिव वैद्य यांची कान्सिलिएटरी हिसकावली. हें वांईतील दाराचे खटल्यांत दोषी ठरून त्यांस कैदेची शिक्षा झाली, सबब अनुक्रमें सेकंडक्लास सरदारी व कान्सिलिएटरी काढून टाकल्याबद्दल सरकारी गॅझिटांत ठराव प्रसिद्ध झाले. अशा प्रकारें सरकारानें दिलेल्या फुकट्या पदव्यांचा त्यांना फायदा तर नव्हताच; पण प्रसंगीं तोटा आहे, हें मात्र दाखवितां येईल, तेव्हां अशा प्रकारच्या पदव्या सरकारनें हिसकावल्या म्हणून कोणालाही दुःख करण्याचें कारण नाहीं; मात्र यांत सरकारी अधिकारी किती क्षुल्लक मनाचे असतात, हें मात्र स्पष्ट व्यक्त होतें. त्याचप्रमाणें रा. वामनरावजी कुळकर्णी यांचा कु-

ळकर्णेपणाचा हक्क रद्द करून त्यास अन्नाला जन्याचे मोताद केले. त्यांपैकीं कित्येक लोक इनामदार व जहागिरदार आहेत, तेव्हां सरकारशीं बेइमानानें वागल्याचा त्यांच्यावर टपका ठेऊन त्यांची इनामें व जहागिरी जप्त करण्याबद्दल त्यावेळचे जिल्हा अधिकाऱ्याकडून बरीच खटपट झाली, अशी वार्ता ऐकूं येत होती, पण त्याचा परिणाम त्याना श्रेयस्कर झाला नाही, असें दिसतें. वांईतील न्यूइंग्लीश स्कूलास सरकाराकडून प्रॉव्हिन्शियल ग्रँट मिळत असते; या शाळेचे चालकात रा. अनंतराव जोशी व रामकृष्णपंत लेले. हे आहेत; ही संधी पाहून यांच्या ग्रँटवर टांच मारण्याचाही प्रयत्न झाला व शाळा आधिकाऱ्याकडून त्यास असें लिहून आलें कीं, वांईतील द्रांराच्या खटल्यांत शिक्षा झालेले रा. जोशी व रा. लेले यांचा तुमचा शाळेशीं जो निकट संबंध आहे, तो तुम्ही जर सोडण्यास तयार व्हाल तर तुम्हास आमचे कडून मदत मिळेल; नाहीं तर असलेली मदत बंद करण्यांत येईल. तेव्हां सदर शाळेचे सुपरिन्टेंडेंट रा. गोपाळरावजी भिडे यांनीं मोठ्या धूर्ततेनें मार्मिक उत्तर पाठविलें; त्यांत यांनीं स्पष्ट लिहिलें होतें कीं, सरकारानें आमची ग्रॅन्ट काढून घेतल्यामुळें या शाळेचें जें नुकसान होणार आहे; तितकें किंबहुना त्यापेक्षां जास्त नुकसान सदर दोन गृहस्थ आमच्या शाळेंतून कमी झाल्यानें होणार आहे, या उत्तरानें सरकारची खात्री पटल्यामुळें म्हणा; पण सरकाराकडून हें प्रकरण वाढविण्यांत न येतां तेथल्या तेथेंच सें जिरल्यासारखें झालें. सर्व आरोपी

शिक्षेतून सुटून आल्यावर त्यांना छळण्याचा क्रम अशा प्रकारें सुरू झाला होता; पण वर सांगितलेले प्रकार झाल्यानंतर त्या छळाचें शेंपूट संपल्याचें चिन्ह दिसूं लागलें; इतक्यांत रा. त्रिंबकराव हुशिंग यांचा खटला सुरू झाला. तेरा असामीचे खटले चालले असतांना रा. हुशिंग हे गैरहजर होते; त्यांना आपल्यावर खटला आहे असें कळल्याबरोबर ते साताऱ्यास एकदम कलेक्टरपुढें जाऊन हजर झाले. रा. हुशिंग यांच्यावर तीनही खटले होते; हें पूर्वी प्रत्येक खटल्यांतील आरोपींची जी यादी दिली आहे, त्यावरून वाचकांचे ध्यानांत असेलच. रा. हुशिंग यांचा खटला मि. ऑर्थर असिस्टंट कलेक्टर सातारा यांच्यापुढें सुरू झाला. पुढें लवकरच साहेबांची स्वारी जिल्ह्यांत फिरावयास गेल्यामुळें रा. होशिंग यासही त्यांच्या पाठीमागें जावें लागलें; अखेर पाटण खोऱ्यांत स्वारी असतांना तेथें त्यांच्यावरील खटल्याची ' समरी ट्रायल ' संक्षिप्त चौकशी करून प्रत्येक खटल्याबद्दल त्यास एक एक महिन्याची ह्मणजे तीन महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा दिली. आरोपींस वकील सुद्धां देतां येणार नाहीं, अशा ठिकाणीं खटला सुनावणीला काढल्यामुळें व ' समरी ट्रायल, ' झाल्यामुळें पुरावा वगैरे देण्यास बरीच अडचण झाली; पण ही तक्रार करायाची कोणापुढें व दाद घेणार कोण? अखेर रा. होशिंग यांनीं हायकोर्टांत अपील केलें, तेव्हां अपीलाचा निकाल होईपर्यंत रा. होशिंग यास जामिनावर खुले करण्यांत आले, ही मोठी मेहेरबानीच ह्मणावयाची; पण अखेर हाय-

कोर्टांतही दाद न लागतां रा. होशिंग यांची शिक्षा कायमक-रून हायकोर्टानें दुसऱ्यांदा अन्याय केला, हें लिहिण्यास प्रस्तुत लेखकास मोठी शरम वाटते. तेरा असामींच्या खटल्याचा निकाल करते वेळेस हायकोर्टाची नजरचूक झाली असेल, असें मानण्यास जागा होती, व या दुसऱ्या प्रसंगीं तरी झालेली चूक हायकोर्ट दुरुस्त करील, अशी आशा वाटत होती; पण पालथ्या घागरीवर पाणी. अस्तु. येणेंप्रमाणें वांई प्रकरण बहुतेक संपल्यासारखेंच झालें; पण मध्यंतरीं सरकारानें त्या वेळीं वाईस असलेले फडणीस रा. विष्णु केशव देशमुख बि. ए. यास सपिंड करून त्याजवर खोटी साक्ष दिल्याबद्दल फिर्याद करण्यांत आली. तेरा असामींवर वांई गुन्ह्यामीं खटले होऊन त्यास ज्या कडक शिक्षा देण्यांत आल्या, त्या खटल्यांत रा. देशमुख यांची थर्ड क्लास माजिस्ट्रेट या नात्यानें साक्ष झाली होती; ती साक्ष रा. देशमुख यांनीं खऱ्या भावानें व निःपक्षपातानें दिली असल्यामुळें त्यांच्या साक्षींत कांहीं भाग फिर्यादी पोलिसास अनुकूल व कांहीं प्रतिकूल असा निघाला; जो भाग प्रतिकूल निघाला, तो अर्थात शिक्षा देणाऱ्या माजिस्ट्रेटास व इतर पोलिस अधिकाऱ्यास व जिल्हा अधिकाऱ्यास रुचला नाहीं. चवकशी करणाऱ्या माजिस्ट्रेटनीं तर रा. देशमुख याजवर निकाल पत्रकांत आपली अजब कल्पना शक्ती खर्च करून खरमरीत टीका केली व त्यांच्या साक्षीवर भरंवसा ठेवला नाहीं. त्याचा फायदा घेऊन अथवा प्रतिकूल साक्ष दिली, हा आकस मनांत धरून म्हणा, त्यांच्यावर खटला चाल-

विण्यास हुकार मिळविला. तो हुकार रद्द होण्याक रितां रा देशमुख यांनीं सातारा डिस्ट्रिक्ट व सेशनकोर्टाचे जज्ज मि. सत्येंद्रनाथ टागोर यांच्यापुढें अपील केलें; त्या अपीलाची चौकशी होऊन मि. टागोर यांनीं तो हुकार रद्द केला; मि. देशमुख यांना नोकरीवरून काढून टाकल्यापासून हा हुकार रद्द होण्यास ९ । १० महिने लागले. पुढें हा हुकार रद्द होऊन मि. देशमुख यांनीं खोटी साक्ष दिली नाहीं, असे सिद्ध झाल्यावर पुन्हां त्यांची जागा त्यास देण्यांत आली; मात्र त्यांची वाईहून बदली करून सातारा जिल्ह्यांतील हवापाण्यासंबंधानें अति वाईट असलेला तालुका जो पाटण त्या तालूक्यांत त्यांची नेमणूक केली. अस्तु. येथपर्यंत सरकारी अधिकाऱ्यांनीं वाईतील लोकांस कसे छळलें, याचें वर्णन केलें; आतां मि॰ रॅन्ड यांनीं जो वाद्याचा जाहिरनामा वाईमध्यें लावला, त्याचा कसा फजितवाडा झाला, हें पाहूं.

मि. रॅन्ड यांनीं वाई मुक्कामीं जो वाद्याचा जाहिरनामा लावला, त्यांत अनेक कलमें होतीं; पण वाईकर लोकांच्या हाडीं खिळण्याजोगें जें एक कलम होतें. तें हें कीं, सार्वजनिक रस्त्यांत वाद्यें वाजविणें असेल तर पोलीसांची परवानगी मागावी. हें कलम वांईकर लोकांच्या मर्मस्थानीं सुईसारखें टोंचलें गेलें; नुकत्याच झालेल्या भयंकर प्रकारामुळें पोलिस ह्मटलें कीं, वांईतील प्रत्येक मनुष्याचें अंगावर कांटा उभा राहीं; इतकी दहशत असल्यामुळें पोलीसाकडे परवानगी मागण्यास कोणाचेंही धाडस होईना. शके १८१६ सालच्या मार्गशीर्ष महिन्यांत जी क-

न्कार्यें वांईत झालीं, तीं सर्व विन वाद्यानें झालीं; व असेर तोच विचार सगळयांना पसंत पडला. पोलीसाकडे वाद्यासंबंधीं परवानगी मागण्यास जाऊं नका, असें सांगण्याचें कोणास कारणच पडलें नाहीं. आपोआपच ती गोष्ट अमलांत आली, या वरून लोकांना पोलिसची दहशत केवढी जबरदस्त बसली होती, हें वांचकांस कळून येईल. त्या सालीं वांईत अगदीं नाहीं तरी २००, ४०० कार्य झालें असेल, पण मुकाट्यानें, नवरा मुलगा सासूरवाडीस गेला तरी मुकाट्यानें व आला तरी मुकाट्यानें; हाच प्रकार सर्व ठिकाणीं दिसत होता. वांईस श्रीकृष्णाबाईचे उत्सव मोठ्या थाटानें होतात, इतके कीं, तसे समारंभ या प्रांतांत कोठेंही होत नाहींत; पण वाद्याची परवानगी घ्यावी लागेल, म्हणून शके १८१६-१७ सालीं श्री कृष्णाबाईचे उत्साह हो थाटानें झाले नाहींत. खाजगी रीतिनें ते समारंभ थोडक्यांत वाद्याची परवानगी न घेतां उरकून घेतले. सारांश सुमारें एक वर्ष सव्वा वर्ष पर्यंत वांईक्षेत्रांतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यांत कोणत्याही प्रकारचे वाद्य—म्हणजे शीपंटा सुद्धां— न वाजल्यामुळें परवानगी देण्याकरितां पोलिस कडून जर कोर्ट छापून आली असली तर त्यांतील एक पानही खर्च करण्याची तसदी वांईकरांनीं पोलिसास दिली नाहीं, यावरून मि. रँन्ड साहेबांना वांईत वाद्याच्या लावलेल्या जाहिर नाम्याचा कसा फाजिलवाढा उडाला, हें सहज कळून येईल.

पुढील हकीकत देण्यापूर्वी येथें एवढें लिहिल्यावाचून पुढें चालवत नाहीं कीं, या भयंकर प्रसंगाचे वेळीं सातार

िल्ह्यास जे अधिकारी मिळाले होते, ते सर्व अॅक्टिंग (तात्पुरते ) होते. मि. रॅन्ड साहेब हे अॅक्टिंग कलेक्टर होते, चौकशी करणारे माजिस्ट्रेट मि. केनडी हेही अॅक्टिंग होते; फिर्यादी मि. दुल्लाखान हेही पोलिस इन्स्पेक्टरचे जाग्यावर अॅक्टिंग होते व दुय्यम फिर्यादी मि. तुकाराम बहिरजी हेही वांई फौजदारीचे जाग्यावर अॅक्टिंग होते. सारांश, त्यावेळीं सातार जिल्ह्यास जे अधिकारी मिळाले होते व ज्यांनीं वांईतील लोकांवर आग पाखडली, ते सर्व अॅक्टिंग असल्यामुळें त्यांचें अॅक्टिंग—नाटकी—असें झालें, यांत मोठेसें नवल नाहीं. असो. आतां यानंतर वांईकरांनीं काय केलें, हें पाहूं.

श्री. विनायक अमृत ऊर्फ तात्यासाहेब पंत राजाज्ञा यांच्यावर तीन खटले होते; पैकीं पहिल्या दोन खटल्यांत त्यांजवर दोष शाबीत धरून मि. केनडी यांनीं त्यास एकांत शिक्षा व दुसऱ्यांत दंड केला व तिसऱ्या खटल्यांत त्यास दोषमुक्त करून सोडून देण्यांत आलें; ही गोष्ट वाचकांचे ध्यानांत असेलच; श्री पंत यांनीं तुरुंगांतून सुटून आल्यावर ज्या खटल्यांत ते दोषमुक्त झाले होते, तो खटला आपल्यावर विनाकारण व दुष्टबुद्धीनें केला, अशा अर्थाची फिर्याद मि. दुल्लेखान व मि. तुकाराम बहिरजी यांजवर सातारा डिस्ट्रिक्ट कोर्टांत दिली; व नुकसानीचे सुमारें ११०० रुपये मागितले. सदर फिर्याद मि. टी. डी. फ्राय आसिस्टंट जज्ज सातारा यांचे पुढें चालून अखेर ता. ९ डिसेंबर सन १८९५ रोजीं त्याचा निकाल झाला;

त्यांत मि. पंत यांची फिर्याद प्रतिवादींवर शाबीत होऊन अब्रू नुकसानीबद्दल रोख रुपये ३०० व या दाव्याचा खर्च इतके जज्ज साहेबांनीं मि. दुल्लाखान व मि. तुकाराम बाहिरजी यांजकडून वादीस ह्मणजे श्री. पंत यांस देवविले; या खटल्याचा निकाल थोडा का होईना, पण समाधानकारक होईल, अशी कोणासही त्या वेळचे अधिकारी मंडळ पाहून आशा वाटत नव्हती; व ह्मणूनच रा. रामकृष्णपंत ऊर्फ नाना साहेब वैद्य हे पहिल्यांत दोषमुक्त झाले असूनही त्यांनीं त्याबद्दल फिर्याद दिली नाहीं. पहिल्या खटल्याचा खर्च अंगावर आहेच; तेव्हां ही फिर्याद लावून हा दुसरा खर्च अंगावर सोसणें ह्मणजे जाणून बुजून पायावर धोंडा पाडून घेण्यासारिखें आहे, असें त्यांस वाटलें. श्री तात्या साहेब पंत यांसही असें करणें धाडस वाटलें व वांईतील सर्व प्रमुख प्रमुख लोकांचाही तसाच अभिप्राय पडला; पण अखेर श्री. पंत यांनीं खर्च झाला तरी बेहेत्तर आहे, पहिल्या खटल्याचा खर्च सोसला, तसा हाही सोसण्यास मी तयार आहे, फिर्याद लावून आपल्या दुर्दैवाची आणखी एकदां परिक्षा पाहूं या, असा संकल्प करून त्यांनीं फिर्याद धडकावली; व पुढें सर्व अधिकारी मंडळ बदलून सरळ मनाचें मि. फ्राय साहेबा सारिखे अ. जज्ज वांईकरांस लाभले व त्यामुळें वांईकरांस कांहीं आनंदाचे दिवस दिसूं लागले.

दुसरी फिर्याद मि. वासुदेव बाबूराव पंडित यांनीं मि. रॅन्ड त्या वेळचे कलेक्टर याजवर त्यांनीं वांईमध्यें वाद्याचा जाहिरनामा विनाकारण लावला व

त्यामुळें हक्काचें व वाहिवाटीचें नुकसान झालें, अशा मुद्यावर लावली; पण पुढें मे. वुईचेस्टर साहेब कलेक्टर यांनीं योग्य अभिवचनें दिल्यामुळें पुन्हां फिर्याद करण्याचा हक्क ठेऊन मि. रॅन्ड याजवरील फिर्याद काढून घेतली; यानंतर लवकरच मे. वुईचेस्टर साहेब हे वांई मुक्कामीं गेले व त्यांनीं हिंदु-मुसलमान या दोन्ही जातींतील पुढाऱ्यांच्या भेटी घेऊन सर्व गोष्टी ऐकून घेतल्या. हिंदु लोकांचा हक्क, त्यांची वहिवाट व मशिदीवरून वाद्यें न वाजविण्याची अवश्यकता इत्यादि अवश्यक गोष्टींची त्यांनीं मोठ्या काळजीनें व प्रत्यक्षाप्रत्यक्ष तऱ्हेनें चौकशी केली; व त्यावरून वांईकर लोकांचा असा पूर्ण ग्रह झाला कीं, मे. वुईचेस्टर साहेब हे आपल्याला खास न्याय देणार; पण मि. केनडी साहेबांनीं आरोपींची चौकशी करतांना जो मानभावीपणा दाखविला, त्यापेक्षां मे. वुईचेस्टर साहेबांची कृति जास्त समाधानकारक खास झाली नाहीं मेहेरबानांच्या चोकशीच्या तऱ्हेवरून जी आशा करण्यास जागा होती, ती जाहिरनामा लागल्यावर समूळ नष्ट झाली; व वांईकर लोकांची अशी खात्री झाली कीं, युरोपियन लोकांवर कदापि विश्वास ठेऊं नये. त्यांच्या हातून जें मिळालें तें आपलें, जें मिळावयाचें आहे, अथवा देऊं ह्मणून आश्वासन दिलेलें जें आहे, तें भरवंशालायक नाहीं. हे युरोपियन लोक म्हणजे पक्के आपमतलबी; मूळ हेतू कधींही सोडणार नाहींत; मग त्याकरितां न्यायनीतिस आग लागली तरी बेहत्तर आहे. वांईकर लोकांची ही मोठी इच्छा कीं, वाद्यें वाजविण्याबद्दल

पोलिसची परवानगी आह्मी कधींही घेणार नाहीं; व ती त्यांची इच्छा मे. वुईचेस्टर साहेब हे आपला डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटीचा अधिकार चालवून मे. ब्राऊन पोलिस सु० साहेबास पूर्ण करण्यास भाग पाडतील, असें वाटत होतें; पण मे. वुईचेस्टर साहेबांना तसें करतां आलें नाहीं, ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे मे. वुईचेस्टर व मे. ब्राऊन साहेब यांनीं आपल्या जाहिरनाम्याच्या पुनरावृत्ती शके १८१७ च्या माघ महिन्यांत काढल्या; व त्या जवळ जवळ पूर्वीं सारख्याच होत्या; सारांश, वांईशहरांत वाद्यें वाजविण्यास पोलिसचे परवानगीची जरूर अद्यापही पडते; पण वांईकर मात्र अद्यापही ती परवानगी घेत नाहींत व वाद्यें ही वाजवीत नाहींत. वांईकर लोकांस शिक्षा झाल्यापासून हें पुस्तक प्रसिद्ध होईपर्यंत वांईच्या सार्वजनिक रस्त्यांत कोणत्याही लहान मोठ्या वाद्यांचा आवाज झाला नाहीं; मात्र वांईचे सध्यांचे मामलेदार रा. सा. लाटकर यांनीं मात्र सगळ्या वांई शहराला धाब्यावर बसवून नव्हे आपल्या सगळ्या हिंदुजातीचा अपमान करून केवळ-केवळ-गोऱ्या अधिकाऱ्यांस खुष करण्याकरितां आपल्या मुलाचे मौंजीबंधनाचे वेळीं परवानगी घेऊन वाद्यें वाजविलीं, याबद्दल फार खेद वाटतो. आमच्या रा. सा. मामलेदारांना व्रतबंध वाद्यें लावूनच करण्याचा होता, तर त्यांनीं दुसऱ्या एखाद्या शहरांत जाऊन आपला हेतू पूर्ण करून घ्यावयाचा होता, पण जी गोष्ट वांईंत होत नाहीं, ती करण्यास रा० सा० मामलेदारासारख्यानीं तयार व्हावें .व तेही कांहीं टोपीवाल्यांना खुष करण्या-

करितां व्हावें हें फार गैर आहे, असें आमच्या अल्पमतीस वाटतें. वाद्यांच्या जाहिरनाम्यासंबंधानें रा. पंडित यांनीं जिल्हा अधिकाऱ्यावर जी फिर्याद लावली होती, ती मे० वुईचेस्टर साहेब आपली कांहीं दाद घेतील, या आशेवर काढून घेतली होती, पण मे. वुईचेस्टर साहेबांनीं काय दिवटा पाजळावयाचा तो पाजळलाच, तेव्हां सदर पंडीत हे आपली फिर्याद पुन्हां लावतीलच. निमजग्यावर वाजविण्याच्या वहिवाटीसंबंधानें नुकसानीचा दावा वांई येथील सबजज्ज कोर्टांत वे. शा सं. काशिनाथ वामन लेले एडिटर मोदवृत्त, आर्यधर्मदर्पण व आर्यधर्मरहस्य यांनीं लावली आहे; पण किती तरी दिवस झाले, त्याचा अद्याप निकालच झाला नाहीं. अस्तु. येणेंप्रमाणें वांईत उपस्थित झालेल्या या प्रकारणाची हकीकत आहे; आतां उपसंहारादाखल दोन शब्द लिहून वाचकांची रजा घेऊं.

वांईतील सभ्य, प्रतिष्ठित व अनुदार लोकांवर हा जो भयंकर प्रसंग गुदरला, तो कित्येक पिढ्यापर्यंत स्मरणांतून जाणार नाहीं, ही गोष्ट सत्य आहे. आम्ही तर येथें स्पष्ठ ह्मणतों कीं, या प्रकरणांत झालेल्या आ न्यायाप्रमाणें अन्याय या देशांत दुसरा कोठेंही झाला नाहीं. सर्व मंडळी तुरुंगांतून सुटून आल्यावर प्रस्तुत लेखकानें त्यांपैकीं कित्येक लोकांची मुद्दाम गांठ घेऊन त्यांस विचारलें कीं, तुह्माला झालेली शिक्षा आतां कांहीं परत येत नाहीं; पण तुह्मी त्या जागीं जाऊन तुमच्यावर केलेल्या आरोपाप्रमाणें तुमच्या हातून खरोखर कांहीं झाले होते काय? तेव्हां त्यांपैकीं कित्येकांनीं

सांगितले कीं, आह्माला ज्या शिक्षा झाल्या, त्याबद्दल आह्माला मुळींच दुःख होत नाहीं, पण त्या अन्यायानें झाल्या, याबद्दल आह्मी फार दिलगीर आहों. सदर द्वाराचे प्रसंगीं आम्ही तेथें मुळींच नव्हतों, असें असून आह्माला शिक्षा झाली, हें आमचें दुर्दैव होय. कित्येकांनीं असें सांगितलें कीं, आम्ही द्वाराचा समारंभ पाहण्यास गेलों होतों; पण आम्ही मेळ्यांत मुळींच नव्हतों. जो गृहस्थ झांज वाजवीत होता, त्याची आमची ओळख सुद्धां नाहीं. झांज वाजविली, असा ज्यांच्यावर आरोप होता, ते ह्मणत, आम्ही मेळ्यांत होतों; एक झांज वाजत होती व सरकारी हुकूम अमान्य करावा, हा विचार आमच्या मनांत सुद्धां आला नाहीं. झांज हें वाद्य नाहीं, या पूर्ण समजुतीनें आम्ही ती वाजविली. आम्हाला झांज वाजवयाला कोणी सांगितलें नाहीं व वाजवूं नका, असेंही कोणी आह्माला ह्मणाले नाहीं. सदर उद्धार शिक्षा भोगून आल्यावर सदर आरोपींच्या तोंडून खाजगी निघाले असल्यामुळें ते खरे मानण्यास कोणत्याही प्रकारची हरकत दिसत नाहीं, असें असून व चौकशींत हेंच निष्पन्न झालें असून वांईकर लोक या न्यायी ह्मणविणाऱ्या इंग्रजी राज्यांत तुरुंगांत जातात व अखेरपर्यंत त्यांची दाद लागत नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय? माजिस्ट्रेट साहेबांनीं ठराव पत्रकांत जे कल्पनातरंग उठवून दिले आहेत, ते वाचले ह्मणजे माजिस्ट्रेट साहेबांची कल्पना शक्ति किती तरतरीत आहे व एका टाकांत एकास विश्वासू व दुसऱ्यास अविश्वासू ठरविण्याची माजिस्ट्रेट साहेबांची हातोटी किती उमदी आहे

व त्यांचें कायद्याचें ज्ञान तरी किती उच्चपदास जाऊन पोंचले आहे, याची कल्पना वाचकांस सहज करतां येईल. आम्ही ते सर्व ठरावच भाषांतर रूपानें या पुस्तकास जोडणार होतों, परंतु तसें केल्यास कालाचा व स्थलाचा अपव्यय होईल, अशी खात्री असल्यामुळें तो बेत रहित करावा लागला याची दिलगीरी वाटते; कोणास शंका आल्यास त्यांनीं ते ठराव अवश्य मिळवून वाचावेत, अशी आम्ही शिफारस करतों. खरोखर पाहिलें असतां आरोपींनीं गुन्हे केले, असें जरी कल्पनेनें मानले, तरी नुसत्या दंडावर भागले असते. पण शिक्षाच देण्यासंबंधानें माजिस्ट्रेट साहेबांनीं आपल्या ठरावांत (Judjement) जें विधान केलें आहे, तें फार लक्षांत ठेवण्यासारखें आहे, तें असें—'शिक्षा देताना मला दोन गोष्टींचा विचार कर्तव्य आहे. हिंदु समाजांतील लोक कायद्यानें वागणारे आहेत, हा विचार लक्षांत घेऊन वांईमध्यें उघड उघड झालेली ही आज्ञा अमान्य करण्याचीं चिन्हें चांगली दर्शविण्याची आवश्यकता फारच आहे, असें मला वाटतें; परंतु हे लोक सर्व प्रतिष्ठित व उच्च कुलांतील असल्यामुळें त्यांना कैदेनें होणारी अडचण व बेअब्रू इतरापेक्षां जास्त होईल, हें ही मला तितकेंच स्पष्ट दिसत आहे. सबब दंड योग्य आहे, असें मला वाटत नाहीं आणि शेवटीं असें निश्चित वाटतें कीं, थोड्या दिवसांचे कैदेनें सर्व हेतू सिद्धीस जातील." या माजिस्ट्रेट साहेबांच्या कल्पना तरंगावर जर आम्ही टिका तरंग उठवीत बसलों, तर झाले या पेक्षां दुप्पट पुस्तक मोठें

...ल, सत्व वाचकांनीं आपल्या मनाशींच त्याजवर टीका करावी, हें बरें दिसतें. अपीलांत हायकोर्ट जज्जानीं ही अशाच अर्थाचे उद्गार काढले होते ह्मणतात; त्यांचें ह्मणणें असें होतें कीं, '२१|२१ दिवसांच्या शिक्षा त्या काय आणि त्याजवर हायकोर्टांत अपील होतें तें काय?' बरोबर आहे. असे उद्गार काढणाऱ्या हायकोर्ट जज्जावर जोंपर्यंत तसा प्रसंग गुदरला नाहीं तोंपर्यंत अशा प्रकारच उपदेश त्यांनींही करूं नये हें बरें।

वांईतील सभ्य गृहस्थास विनाकारण तुरूंग भोगावा लागला, तो कांहीं आतां परत येत नाहीं; परंतु आमचे सरकार अजून तरी या खटल्यांसंबंधीं पूर्ण चौकशी करून वांईकर सभ्य गृहस्थास निर्दोषी ठरवील व त्यांच्या हिरावून घेतल्या पदव्या व हक्क त्यांचे त्यास परत देईल अशी आह्मास बळकट आशा आहे.

वाचकांची रजा घेण्यापूर्वीं आह्माला वांईतील शिक्षा झालेल्या लोकांस ही विनंती केली पाहिजे कीं, सरकारच्या कोत्या दृष्टीनें तुह्मी दोषी ठरून तुह्माला तुरुंगवास भोगावा लागला, याबद्दल तुह्मी आपल्या मनास कोणत्याही प्रकारें दुःख होऊं देऊं नये. सरकारच्या मतानें जरी तुमची योग्यता कमी झाली असेल, तरी लोकांच्या दृष्टीनें तुमची महती फार वाढली आहे, पूर्वीपेक्षां तुमच्याबद्दल लोकांत पूज्यभाव फार वाढला आहे हें पक्कें ध्यानांत ठेऊन आपल्या लोकहिततत्परतेंत किंचित्‌ही अंतर पडूं देऊं नका, अधिक उत्साह धरा व राष्ट्रकार्य करण्याची पूर्ण उमेद धरून पुढें पाऊल टाका. स्वजनांचे हिताकरितां झटणाऱ्या लोकांवर यापेक्षां ...

प्रसंग कोसळतात, हें आपणास इतिहासावरून ठाऊकच असेल; पण त्या दुर्धर प्रसंगाला न भितां सत्याचा पाया बळकट धरून जे स्वकर्तव्य विसरत नाहींत, ते सांप्रत काळचे राष्ट्रीय संत बनतात व त्यांच्या भजनीं सर्व लोक लागतात, हें आपणास अवगत आहेच, तर त्याप्रमाणें खऱ्या मार्गानें जात असतांना अनेक दुर्धर प्रसंग जरी तुमच्यावर कोसळले, तरी न डगमगतां सत्यकार्यावर पूर्ण निष्ठा ठेऊन वागा, अशी आपली सविनय विज्ञप्ति करून व सत्यसंकल्पाचा दाता परमेश्वर तुम्हांला त्याप्रमाणें वागण्यास धैर्य व उमेद देवो, अशी त्या सच्चिदानंदाची अनन्य भावें प्रार्थना करून रजा घेतों.